New Plinth Certificate

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी,

जा.क्र./भिनिशमनपा/नगररचना/बां.प्र.क्र.-५५/२०१३-२०१३/२१४४ दिनांक :- ५/११/२०१३

(ॲपेंडीक्स XIII )

नियम क्र.६(४)

## पाया तपासणी प्रमाणपत्र

प्रति,

श्री. खंडू गणपत जोशी,श्री. राजाराम बंडू जोशी व इतर-९,श्रीमती अर्चना गणेश जोशी व इतर-५, श्री. सुनील कृष्णा जोशी व इतर-२,श्री. अजय भगवान जोशी व इतर-१,श्री. तुकाराम शनवार जोशी. श्री. जितेंद्र रामचंद्र जोशी व इतर-१,श्री.जयेश दिनेश जोशी,श्रीमती बारकूबाई बाळाराम गुळवी व इतर-२, श्री. तानाजी कोंडू गुळवी व इतर-१,श्रीमती लक्ष्मी अर्जुन पाटील,श्रीमती कमला सुदाम केणे,श्री. शत्रुघ्न कोंडू गुळवी,श्री. सखाराम बंडू जोशी व इतर-५,श्री.प्रविण भगवान जोशी व इतर-१ व श्री. प्रभुदास मदन नाईक

यांचे तर्फे विकासक मे. साई बालाजी डेव्हलपर्स तर्फे श्री. कल्पेश डी.गाला

व्दारा :- आर.के. व असो.

१०१/ए,श्वेता अपार्टमेंट,कासारआळी,भिवंडी

**विषय :- पायातपासणी प्रमाणपत्र मिळणेबाबत.....**

**मौजे-टेमघर येथील स.नं. ६७/४पै,६९/१,८०/१पै,८०/२पै,८१पै**

**इमारत प्रकार-४ए,५ए,६ए,१०ए व ११सी**

**संदर्भ :-१) या कार्यालयाची सुधारीत बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./२०९३**

**दि.३०/१०/२०१३**

**२) आपले इंजिनिअर ह्यांची पायापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतची सूचना पत्र दि.३१/१०/२०१३**

महोदय,

संदर्भिय क्र.१ अन्वये आपणांस **मौजे-टेमघर** येथील **स.नं.६७/४पै,६९/१,८०/१पै, ८०/२पै, ८१पै** मधील **४३०५३.०९ चौ.मी.** क्षेत्रावर बांधकाम परवानगी देण्यांत आली होती. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये आपण **इमारत प्रकार-४ए,५ए,६ए,१०ए व ११सी या** इमारतीचे पायापर्यंतचे बांधकाम पूर्ण केल्याचे कळविले आहे.**दि.०६/११/२०१३** रोजी जागेची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, सदरचे पाया पर्यंतचे बांधकाम हे भिवंडी-निजामपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अनुज्ञेय होत असल्याने इमारतीचे पायावरील बांधकाम पुढे चालु ठेवण्यास बांधकाम परवानगीपत्रांतील अटी व शर्ती कायम ठेवून खालील अटींवर मजुरी देण्यांत येत आहे.

१) पाया तपासणी प्रमाणपत्रानंतर पायामध्ये कोणत्याही स्वरुपाचे फेरफार केल्यास, देण्यात आलेले प्रमाणपत्र रदद करण्यांत येईल व असे बांधकाम अनधिकृत समजुन काढुन टाकण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२) सांडपाणी,मैला निर्मुलनासाठी मनपाचे गटार नसल्यास त्याची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारांची राहील.

३) मनपाच्या पाणी पुरवठ्याची क्षमता व शहराची वाढती लोकसंख्या विचारांत घेता,बांधकामाला पाणीपुरवठा करणे मनपास शक्य नसल्याने अर्जदाराने विषयाधीन विंधन विहीर / कुपनलिकेतील पाणी हे प्रस्तावित बांधकामासाठी वापरणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

२/..,

४) विकासकर्त्याने/जमिनधारकाने बांधकाम वापर करण्यापूर्वी पायाभूत सुविधा विकसित केल्या पाहिजेत.

५) करण्यांत आलेल्या बांधकामात फ्लाय ॲश विटा व त्या आधारीत साहित्य वापर केला असल्याचे संबंधित आर्किटेक्ट/इंजिनिअर यांचेकडील प्रमाणपत्र वापर परवान्यापूर्वी सादर करावे लागेल.

६) भविष्यात इलेक्ट्रीक पोल/ट्रान्सफार्मर करीता जागेची आवश्यकता मनपा अथवा विद्युत मंडळास भासल्यास सामासिक अंतरामधुन अशी जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

७) बांधकाम परवानगीपत्रात नमूद केल्यानुसार इमारतीच्या पाया उत्खननासाठी आवश्यक असलेल्या गौणखनिजाचे स्वामित्वधन मा. जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडे भरणे आपणांवर बंधनकारक राहील.

८) प्रस्तुत प्रकरणी होणारी उपकराची रक्कम ही उर्वरीत इमारतीच्या पाया तापसणी प्रमाणपत्रापूर्वी भरणे आपणांवर बंधनकारक राहील.

९) स्थानिक संस्था कराची रक्कम ही स्थानिक संस्था कर विभागाकडील पत्रानुसार भरणे आपणांवर बंधनकारक राहील तसेच सदर स्थानिक संस्था कराची संपूर्ण रक्कम भरले असल्याबाबतचे पुरावे हे वापर दाखल्यापूर्वी सादर करणे आपणांवर बंधनकारक राहील.

आपला,

प्र.सहाय्यक संचालक,नगररचना,
भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका,
भिवंडी

प्रत :- १) प्रभाग अधिकारी,प्रभाग क्र. यांना माहितीसाठी रवाना.
२) प्रशासकीयअधिकारी,शिक्षण मंडळ,भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी यांचेकडे माहितीकरीता व आवश्यक त्या कार्यवाही करीता